# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990









लातूर वर्ष ४ थे अंक १६५ वा शुक्रवार दि.१३ डिसेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# लोकनेते स्व. गोपीनाथरावजी मुंडे यांची जयंती ; आ. रमेशआप्पा कराड यांच्याकडून अभिवादन

लातूर :- देशाचे ग्रामविकास माजीमंत्री, महाराष्ट्राचे लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांची जयंती १२ डिसेंबर २०२४ गुरुवार रोजी लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात साजरी करण्यात आली यावेळी लातूर ग्रामीणचे आमदार मा. रमेशआप्पा कराड यांच्यासह अनेकांनी स्व. मुंडे साहेब यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

गोरगरीब सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी शेतकरी शेतमजूर दिन दलिताच्या कल्याणासाठी आयुष्यभर संघर्ष करणारे केंद्रीय ग्रामविकास माजीमंत्री, महाराष्ट्राचे लोकनेते आणि तत्कालीन रेणापूर विधानसभा मतदार संघाचे लोकप्रतिनिधी स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या जयंतीचा कार्यक्रम लातूर येथील आ. कराड यांच्या संवाद कार्यालयात संपन्न झाला. यावेळी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील नवनिर्वाचित आमदार मा. रमेशआप्पा कराड यांच्यासह लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपाचे लोकप्रतिनिधी



पक्ष पदाधिकारी कार्यकर्ते आणि स्वर्गीय मुंडे साहेबावर प्रेम करणाऱ्या नागरिकांनी लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

यावेळी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, रेणापूर तालुका अध्यक्ष दशरथ सरवदे, लातूर तालुकाध्यक्ष बन्सी भिसे, संगायो समितीचे वसंत करमुडे, वैभव सापसोड, शिवसिंह सिसोदिया यांच्यासह पद्माकर चिंचोलकर, सुनील होनराव, हनुमंतबापू नागटिळक, सतीश आंबेकर, ज्ञानोबा भिसे, सुकेश भंडारे, डॉ बाबासाहेब घुले, सुरज शिंदे, विष्णुदास शिंदे, प्रताप पाटील, भैरवनाथ पिसाळ, आदिनाथ मुळे, विजय मलवाडे, अशोक सावंत, मनोज कराड, पुंडलिक बेंबडे, चंद्रकांत वांगस्कर, विजय गंभीरे, अमर चव्हाण, लक्ष्मण यादव, विनायक मगर, फुलचंद अंधारे, श्रीकृष्ण जाधव, राजकिरण साठे, व्यंकटराव जटाळ, सुनील चेवले, गोपाळ पवार, रुपेश काळे, नामदेव बेंबडे, चंद्रकांत कातळे, धनराज शिंदे, ललिता कांबळे,सुरेखा पुरी, अनुसया फड, जनाबाई साखरे, शीला आचार्य, सुनीता माडजे, उत्तम चव्हाण, उज्वल कांबळे, धनंजय जाधव, राज गाडे, वाजिद सय्यद, नाथराव गीते, शाम भोळे, दिवाकर कुलकर्णी, किरण मुंडे, प्रभाकर माळी, संजय डोंगरे, नानासाहेब कसपटे, वैजनाथ हराळे, दत्ता सरवदे, नरसिंग येलगटे, गुणवंत करंडे, जयप्रकाश जटाळ, भागवत गीते, देवराव मोहिते, बालाजी केंद्रे, लिंबराज बोंळगे, सुधाकर शिंदे, गोपाळ शेंडगे, शंकर चव्हाण, सचिन सवई, मारुती शिंदे, संजय सूर्यवंशी, गोविंद मुंडे, विनोद कदम, विकास लोंढे, नरसिंग चपटे, संतोष राठोड, नारायण राठोड, राज जाधव, शुभम खोसे, सचिन साबदे, संजय विरुळे, बाबुराव कस्तुरे, ओम चव्हाण, भीमराव मुंडे, लक्ष्मण खलंगरे, वैजनाथ लवटे,दत्तगिरी पवार, महादेव आळणे, भीमाशंकर स्वामी, प्रशांत साखरे, गणेश दुभते, शंकर महाराज, गोविंद राठोड, विष्णू पाटील, अंतराम चव्हाण, काकासाहेब साखरे, नितीन लोंढे, रमेश लहाडे, भीमराज सोमवंशी, वैजनाथ लवटे यांच्यासह लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपाचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मांजरा साखर परिवाराने उस उत्पादक शेतकऱ्यांना २७०० रूपये भाव देण्याचा निर्णय कौतुकास्पद

**क्रांतीकारी शेतकरी संघटनेकडून मांजरा परिवाराचे मार्गदर्शक सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांचा सत्कार**

लातूर / प्रतिनिधी :- मराठवाड्यात दर तीन वर्षांतून एकदा तरी पावसाचा लहरीपणामुळे कधी दुष्काळ पडत असतो कधी उसाची अडचण असते कधी अतिरिक्त उस असतो अशा बिकट संकटातून जात असताना उस उत्पादक शेतकऱ्यांच्या मदतीला धावून येणारे मराठवाडा व विदर्भात सर्वाधिक शेतकऱ्यांना अधिक भाव देणारे मांजरा साखर परिवारातील कारखाने म्हणून राज्याला परिचित आहेत त्या परिवाराचे मार्गदर्शक सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांनी यावर्षी उस उत्पादक शेतकऱ्यांना पहिला हप्ता म्हणून २७०० / रूपये देण्याची घोषणा केली नव्हे तर तातडीने खात्यावर जमा दीले ही एक विश्वासाची परंपरा जपलेला परिवार आहे उस उत्पादक शेतकऱ्यांना जादा भाव दिल्याबद्दल गुरुवारी क्रांतिकारी शेतकरी संघटनेकडून मांजरा परिवाराचे मार्गदर्शक सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करून संघटनेकडून आभार व्यक्त करण्यात आले यावेळी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे सत्तार पटेल राजेन्द्र मोरे,अरुणदादा कुलकर्णी,राजकुमार कसबे,



नवनाथ शिंदे, दत्ता किनकर, प्रज्योत हुडे, अशोकराव दहिफळे,अमर हईबतपुरे,यांच्यासह जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव मारुती महाराज साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष तथा संचालक गणपतराव बाजूळगे, इंदिरा सूतगिरणीचे चेअरमन बाळासाहेब कदम,जिल्हा बँकेचे संचालक राजकुमार पाटील माध्यम समन्वयक हरिराम कुलकर्णी,जिल्हा बँकेचे माजी संचालक संभाजी सुळ,दयानंद बिडवे, साळुंखे सर, आदी मान्यवर उपस्थित होते

शेतकरी चळवळीला विश्वासात घेऊन मांजरा परिवाराने न्याय दिला मराठवाड्यात दरवर्षी सर्वाधिक भाव देण्याचा विक्रम याच मांजरा साखर परिवारावर असून चळवळ टिकवली पाहिजे कारखाना शेतकरी बांधव, उस तोड वाहतूकदार या सर्वांत समतोल राखण्याचे कसब राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी मांजरा साखर परिवाराचे मार्गदर्शक दिलीपराव देशमुख साहेब यांच्यात आहे त्यामुळें आज आशियाना बंगल्यावर गुरुवारी आदरणीय साहेब यांचा सत्कार व आभार व्यक्त केले यामुळें हजारो उस उत्पादक शेतकऱ्यांना लाखोंनी फायदा होणार असल्याचे शेतकरी संघटनेचे नेते सत्तार पटेल राजेन्द्र मोरे अरुण कुलकर्णी यांनी यावेळी माध्यमांशी बोलताना सांगितले.

# भैय्यासाहेब उर्फ यशवंतराव भीमराव आंबेडकर यांना भिक्खु संघा तर्फे अभिवादन





लातूर :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सुपुत्र चैत्यभूमिचे शिल्पकार स्मृतीशेष भैय्यासाहेब उर्फ यशवंतराव भीमराव आंबेडकर यांच्या ११२ व्या जयंती निमित्त पु. भंतेजी पय्यानंद थेरो यांच्या प्रमुख उपस्थितीत भिक्खु संघ व उपासकांच्या सहउपस्थितीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क, लातूर येथे करण्यात आले.

या प्रसंगी भंते बुद्धशील, भंते बोधिराज भारतीय बौद्ध महासभेचे राज्य संघटक डी. एस. नरसिंगे, पांडुरंग अंबुलगेकर, अशोक कांबळे, डॉ. अरुण कांबळे,विनोद कोल्हे, सिद्धार्थ सूर्यवंशी,अनिरुद्ध बनसोडे, उदय सोनवणे,करण ओव्हाळ,मिलिंद धावारे महाराष्ट्र राज्य होमगार्ड महिला सैनिक ई. उपस्थिती होती.

# अभिनव अध्यापक महाविद्यालयाच्या गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांचा माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांच्या हस्ते सत्कार संपन्न

**१५ वर्षापासून गुणवत्तेची परंपरा कायम**

**महाविद्यालयाने गुणवत्तेची परंपरा टिकवली**

मांजरा ट्रस्टचे अध्यक्ष माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ही यशाची परंपरा कायम राहिली असून स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठात अशी परंपरा टीकवणारे अभिनव अध्यापक महाविद्यालय पहिले आहे अशी माहिती मांजरा ट्रस्टचे प्रशासकीय अधिकारी डॉ अजय पाटील यांनी दिली



लातूर / प्रतिनिधी :- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत घेण्यात आलेल्या उन्हाळी-२०२४ बी.एड. च्या परीक्षेमध्ये मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट लातूर द्वारा संचलित लातूर येथील अभिनव अध्यापक महाविद्यालयातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांचा सत्कार मांजरा ट्रस्टचे अध्यक्ष माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपरावजी देशमुख साहेब यांच्या हस्ते बुधवारी आशियाना निवासस्थानी नुकताच करण्यात आला. यावेळी अभिनव अध्यापक महाविद्यालयाचे गुणवंत विद्यार्थी सुबोध सर्वोत्तम गांदळे हे ९१.९२ टक्के गुणांसह विद्यापीठातून सर्वप्रथम तर संगीता भगवान पवार या ९१.३६ टक्के गुणांसह विद्यापीठातून सर्वद्वितीय तसेच महानंदा रामू पांचाळ यास ९०.६४ टक्के गुणांसह विद्यापीठातून सर्वतृतीय उत्तीर्ण झालेले असून महाविद्यालयाचा एकूण निकाल ९८.१६ टक्के इतका लागलेला असून गेली १५ वर्षापासून गुणवत्तेची परंपरा महाविद्यालयाने कायम ठेवून घवघवीत यशाचा आलेख कायम ठेवलेला आहे

याप्रसंगी अभिनव अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुधाकर कुलकर्णी, प्रा. उमेश सुर्यवंशी, संगीता पवार, महानंदा पांचाळ व सुबोध मांदळे यावेळी उपस्थित होते यावेळी मांजरा ट्रस्टचे अध्यक्ष माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करत पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या

# ज्येष्ठांचा अमृत महोत्सव सहस्त्र चंद्र दर्शन व जीवनगौरव पुरस्कार थाटात संपन्न

लातूर / प्रतिनिधी:- ज्येष्ठ नागरिक संघ लातूर तर्फे जेष्ठ नागरिक संघातील सभासदांचा अमृत महोत्सव ,सहस्त्रचंद्रदर्शन व जीवनगौरव पुरस्कारा चे आयोजन करण्यात आले होते स्वागतगीत देवी कुमार पाठक यांनी गायले कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकाश घादगिने व अभियंता आर.बी .जोशी यांनी केले हा कार्यक्रम हॉटेल गायत्री उत्सव येथे साजरा करण्यात आला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय श्री दामोदर थोरात अध्यक्ष दक्षिण मराठवाडा विभाग अंबाजोगाई तर प्रमुख पाहुणे माननीय श्री अविनाश देवशटवार प्रादेशिक उप आयुक्त समाज कल्याण विभाग व माननीय श्री विक्रांत गोजमगुडे माजी महापौर लातूर या मान्यवरांच्या हस्ते सोहळा साजरा करण्यात आला अमृत महोत्सवात श्री रामानुज रांदड, डॉक्टर बी .आर .पाटील ,राजीव नाईक .सहस्त्रचंद्र दर्शनात श्री अशोक गोस्वामी,श्री नाना पाटील,डॉक्टर पांडे आंबेकर,श्री दर्डा पुकराज,श्री देशपांडे वसंतराव,श्री देशमाने गौतमचंद, तर श्री प्रभाकरराव गणपतराव उदगीरकर यांना जीवन गौरव पुरस्काराने मान्यवरांनी सन्मानित केले.सर्व सत्कारार्थी यांचे कुटुंबीय व मित्रपरिवार या कार्यक्रमात सहभागी होते सत्काराला उत्तर म्हणून रामानुज रादंड डॉक्टर बी. आर. पाटील, व प्रभाकरराव उदगीरकर यांनी मनोगते व्यक्त केली श्री अविनाश देवशटवार यांनी ज्येष्ठांसाठी काम करायला आवडते त्यांच्यात रमान व्हावे वाटते व ज्येष्ठांच्या साठी आम्ही कटिबद्ध असल्याचे सांगितले. श्री विक्रांत गोजमगुडे यांनी सुद्धा ज्येष्ठान



विषयी आपुलकी, प्रेम,व त्यांची सेवा हीच ईश्वर सेवा समजतो ज्येष्ठांच्या अनुभवाची शिदोरी आम्हाला पुरेशी आहे त्यांच्याच मार्गदर्शनाने आम्ही मोठे झालोत असे गौरोदगार काढले डॉक्टर दामोदर थोरात सरांनी अध्यक्षीय भाषणात जेष्ठान साठी कार्यक्रम होतात पण असा आगळावेगळा,भव्य दिव्य, नेत्र दीपक कार्यक्रम मी प्रथमच लातूर नगरीत पाहतो म्हणाले संघाचे कार्यकर्त्यांचे त्यांनी तोंड भरून कौतुक केले कार्यक्रमास आलेले सर्व ज्येष्ठ नागरिक महिला भारावून गेले कार्यक्रम यशस्वी करण्याकरता अभियंता आर.बी.जोशी डॉक्टर काशिनाथराव सलगर,शहाजी घाडगे,वसंत बेडे , प्रकाश निला, रमेश भोयरेकर आदींनी परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसिद्ध कवयित्री शैलजा कारंडे यांनी केले तर आभार प्रदर्शन वसंत बेंडे यांनी केले.

## संपादकीय....

# घसरगुंडी जीडीपीची

५.४ टक्क्यांपर्यंत घसरलेल्या ताज्या जीडीपी आकडेवारीवरून एकुणातच सध्याच्या भारताच्या आर्थिक वर्षाचा विकासदर हा सहा टक्क्यांपेक्षा कमी राहील, असे दिसते.

चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत म्हणजे एप्रिल ते जून या काळात आर्थिक विकासाचा दर ६.७ टक्के राहिला तेव्हा अनेक अर्थतज्ज्ञांनी जगातील अन्य देशांच्या तुलनेत आपला विकासदर मजबूत असल्याचा दावा केला होता. तसेच लोकसभा निवडणुकीमुळे सरकारी आणि खासगी क्षेत्रातील आर्थिक व्यवहार मंदावल्याचेही म्हटले गेले. म्हणून केंद्रात नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर अर्थव्यवस्थेची कामगिरी चांगली राहील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. पण हे अंदाज सपशेल चुकले. जुलै-सप्टेंबर या दुसर्या तिमाहीत विकासदर कमी होत तो थेट २१ महिन्यांतील नीचांकी पातळीवर म्हणजेच ५.४ टक्क्यांवर आला. यादरम्यान उत्पादन क्षेत्राचा विकासदर केवळ २.२ टक्के आणि खाण क्षेत्राचा नकारात्मक म्हणजे ०.१ टक्के राहिला. मागील आर्थिक वर्षांत दुसर्या तिमाहीत विकासदर हा ८.१ टक्के होता.

चांगला पाऊस पडूनही अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने मूलभूत मानल्या जाणार्या कृषी आणि संलग्न घटकांचा समावेश असलेल्या क्षेत्राचा विकासदर तीन टक्केच राहिला. दुसर्या क्रमाकांच्या क्षेत्रात म्हणजे वीज, गॅस आणि अन्य सार्वजनिक गरजांचा विकासदर हा गेल्या आर्थिक वर्षाच्या दुसर्या तिमाहीच्या १०.५ टक्क्यांवरून यावेळी ३.३ टक्के नोंदला गेला. त्यानंतर 'टर्शियरी' म्हणजे व्यापार, हॉटेल, परिवहन, दळणवळण, प्रसारण या तिसर्या क्रमांकाच्या क्षेत्राच्या विकासदरात कमालीची घसरण नोंदवली गेली. या तुलनेत आर्थिक सेवा, रिअल इस्टेट आणि व्यावसायिक सेवा क्षेत्रात विकासाचा दर तुलनेने चांगला ६.७ टक्के राहिला आहे. शिवाय लोक प्रशासन, संरक्षण आणि अन्य सेवेतील आर्थिक दर हा मागील वर्षाच्या याच कालावधीतील ७.७ टक्क्यांच्या तुलनेत अधिक ९.२ टक्के राहिला. सोप्या शब्दांत सांगायचे झाल्यास भांडवली खर्चाच्या क्षेत्रात सरकारची गुंतवणूक सुरू आहे आणि या कारणांमुळेच विविध औद्योगिक क्षेत्रात घसरण होत असतानाही त्याची कमी जास्त प्रमाणात अन्य मार्गाने भरपाई होत आहे. ही बाब सार्वजनिक क्षेत्रातील अंतिम वापर खर्चाच्या (पीएङ्गसीई) ४.४ टक्के दरावरूनही अधोरेखित होते. खासगी क्षेत्रातील 'पीएङ्गसीई'चा विकास दर हा अपेक्षेपेक्षा चांगला म्हणजेच ६ टक्के राहिला आहे.

असे असले तरी गुंतवणुकीच्या आघाडीवर गेल्या आर्थिक वर्षात या कालावधीतील तुलनेत उठावदार कामगिरी राहिलेली नाही. ग्रॉस ङ्गिक्स्ड ङ्गॉर्मेशन (जीएङ्गसीएङ्ग) म्हणजे गुंतवणुकीचा विकासदर हा ५.४ टक्के राहिला आणि तो गेल्या आर्थिक वर्षात दुसर्या तिमाहीत १०.२ टक्के एवढा होता. या आकडेवारीवरून खर्च कमी-जास्त प्रमाणात होत असल्याचे दिसून येते; परंतु अपेक्षेप्रमाणे खासगी गुंतवणूकही वेग धरताना दिसत नाहीये हे वास्तव आहे. एप्रिल-मे महिन्यात लोकसभा निवडणूक झाल्याने एप्रिल ते सप्टेंबरपर्यंत भांडवली खर्चात १५.४ टक्के घट पाहावयास मिळाली. नुकत्याच झालेल्या एका अभ्यासानुसार, चालू आर्थिक वर्षात दुसर्या सहामाहीत ११.११ लाख कोटी रुपये खर्च करण्याचे अर्थसंकल्पीय ध्येय पूर्ण करण्यासाठी भांडवली खर्चात ५२.०४ टक्के वेगाने वाढ करावी लागेल आणि ही बाब अवघड आहे. दुसर्या तिमाहीतील आर्थिक विकासाचा दर हा धक्कादायक मानला जात आहे. ही बाब सध्याच्या अर्थव्यवस्थेचे यथार्थ चित्रण घडविते.

कमी भांडवली खर्च, खासगी क्षेत्रातील गुंतवणुकीत कमतरता आणि उपभोग अर्थात मागणी कमी राहिल्याने अर्थव्यवस्थेचा खरा चेहरा समोर येणारच होता. त्यामुळे एकूण राष्ट्रीय उत्पादन, विक्री आणि महसुलाच्या आघाडीवर ऑक्टोबर ते डिसेंबर या तिमाहीत अर्थव्यवस्थेची कामगिरी चांगली राहावी, अशी अपेक्षा करू. आर्थिक वर्षाच्या शेवटच्या सहामाहीत अर्थव्यवस्थेची स्थिती चांगली राहील, अशी अपेक्षा आहे. मात्र सध्याची आर्थिक आव्हाने देखील कायम राहतील, असे दिसते. आरबीआयने सध्याच्या आर्थिक वर्षात आर्थिक विकासाचा दर सुरुवातीला ७.२ टक्के निश्चित केला होता, परंतु सध्याची स्थिती पाहिली तर पतधोरण समिती पुढच्या बैठकीत विकासदराचा अंदाज बदलेल. नोव्हेंबरच्या निवेदनात आरबीआयने दुसर्या तिमाहीतील विकासदर ६.७ टक्के आणि तिसर्या तिमाहीत ७.६ टक्के राहील, असा अंदाज व्यक्त केला हाता. त्यापूर्वी त्याने चौथ्या तिमाहीत ७.४ टक्के विकासदराचा अंदाज बांधला होता.

परंतु स्टेट बँकेने चालू आर्थिक वर्षाचा विकासदराचा अंदाज अगोदरच कमी करत तो ६.५ टक्के ठेवला आहे. अर्थात, मागचा अनुभव पाहता आर्थिक वर्षाच्या शेवटच्या दोन तिमाहीत सरकार पायाभूत सुविधांच्या खर्चात वाढ करते. यावेळी दुसर्या तिमाहीतील कामगिरी खराब राहिल्याने सरकारी गुंतवणुकीत वाढ होण्याची शक्यता अधिक आहे. त्यातही चांगली बाब म्हणजे तिसर्या तिमाहीत उत्पादन, म्हणजे उत्पादन क्षेत्राने वेग पकडला आहे. विकासदरातील घसरणीचा माहोल पाहून निर्मला सीतारामन आणि पीयूष गोयल यांच्यासारख्या केंद्रीय मंत्र्यांकडून व्याजदरात घट करण्याची मागणी केली जात आहे. त्यामुळे व्यापार आणि उद्योग क्षेत्रांना अधिक कर्ज घेण्यासाठी प्रेरणा मिळेल, हा त्यामागचा उद्देश.

परंतु आरबीआयने सलग दहाव्या आढावा बैठकीत रेपोरेट हा ६.५ टक्के 'जैसे थे'च ठेवला. ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित किरकोळ चलनवाढ सप्टेंबरच्या ५.४९ टक्क्यांवरून वाढत ६.२१ टक्क्यांवर पोहोचलेली असताना आणि ती चौदा महिन्यांतील विक्रमी पातळीवर असताना तसेच आरबीआयच्या अंदाजापेक्षा अधिक असताना व्याजदरात कपात करण्याचा निर्णय घेणे कठीण होते. विकासात घसरण आणि चलनवाढ होत असताना समितीच्या सदस्यांना रेपोदर कायम ठेवण्यावाचून पर्याय नव्हता.

अशावेळी आर्थिक वर्षात कॉर्पोरेट उत्पन्नाच्या स्थितीचे आकलन करणे देखील महत्त्वाचे आहे. कारण सर्वांचे लक्ष आता खासगी गुंतवणुकीवर आहे. म्हणूनच अर्थव्यवस्थेचा विकास करण्यासाठी खासगी गुंतवणुकीत वाढ करणे गरजेचे आहे. कर्ज घेण्याच्या खर्चात वाढ आणि मजुरी ठप्प पडल्याने शहरी भागातील खासगी क्षेत्राची गुंतवणूक जी जीडीपीच्या ६० टक्के वाटा उचलते, त्यातही घट झाली आहे. ग्रामीण भागातील मागणीतील वाढ कमी अधिक होत असली तरी भविष्यात ती वाढ कायम राहते की नाही, हे पाहणे महत्त्वाचे आहे. या कारणांमुळेच उर्वरित दोन तिमाहीची कामगिरी अर्थव्यवस्थेच्या स्थितीच्या दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाची असणार आहे.

# सीरियाचा मोकळा श्वास!

सीरियातील हुकूमशाही अखेर संपुष्टात आली. आता सत्ताबदलाची तयारी सुरू आहे. मात्र नव्या सरकारबाबत स्पष्टता नाही. सीरियन लष्कराच्या माघारी नंतरही जगाच्या नजरा सीरियाकडे लागल्या आहेत.

सीरियात अध्यक्ष बशर अल-असाद यांच्या कुटुंबाची सलग ५४ वर्षे जुनी राजवट संपुष्टात आली आहे. बशरला शेवटी देश सोडून पळून जावे लागले. त्याने रशियात आश्रय घेतला अशी शक्यता आहे. 'हयात तहरीर अल-शाम' (एचटीएस) च्या नेतृत्वाखालील बंडखोर गटांनी हमा आणि अलेप्पोसारख्या राजधानी दमास्कससह देशातील अनेक प्रमुख शहरे ताब्यात घेतली आहेत आणि सरकारच्या पतनाला हुकूमशाहीचा अंत असे म्हटले आहे. लष्करानेही बशर राजवट संपल्याचे जाहीर केले आहे. बशर आणि त्याचे वडील हाफेज अल-असद यांनी सीरियावर ५४ वर्षे राज्य केले. १९७१ मध्ये हाफिजने लष्करी बंड करून सत्ता काबीज केली. १९४६ मध्ये देशाच्या स्वातंत्र्यानंतर सीरियामध्ये सत्तापालटाचे अनेक अयशस्वी प्रयत्न झाले आणि या राजकीय अस्थिरतेमध्ये हाफिजचा उदय झाला. हाफिज अलावाइट नामी अल्पसंख्याक समुदायाचा होता. त्याने स्वत:ला सत्तेवर स्थापित करण्यासाठी देशातील जातीय विभाजनाचा फायदा घेतला.

'फूट पाडा आणि राज्य करा' ही रणनीती त्याने स्वीकारली आणि त्याच्या सरकारमधील महत्त्वाच्या लष्करी आणि सरकारी पदांवर फक्त अलावी समुदायातील नियुक्ती केली. यामुळे कुटुंबाच्या अनेक दशकांच्या राजवटीचा पाया घातला गेला. हाफिजने १९८२ मध्ये हमामध्ये मुस्लीम ब्रदरहूडचा निर्घृणपणे खात्मा केला होता. यामध्ये हजारो लोक मारले गेले आणि ही घटना हाफिज असादच्या हुकूमशाहीचा सर्वात मोठा पुरावा ठरला. त्याच्या राजवटीत, मतभेद किंवा विरोधाचा एकच परिणाम होता, तो म्हणजे मृत्यू. २००० मध्ये जेव्हा हाफिज अल-असाद मरण पावला, तेव्हा डॉ. बशर अल असादमध्ये लोकांना आशेचा किरण दिसला. पाश्चात्य देशात शिकलेला बशर अल-असाद सुधारणा घडवून आणील, असे लोकांना वाटले. परदेशात वैद्यकीय शिक्षण घेऊन परतलेला बशर राजकारणापासून दूर होता.

मात्र १९९४ मध्ये मोठा भाऊ बसेलचा रस्ते अपघातात मृत्यू झाला. यानंतर सत्ता बशरकडे आली. सुरुवातीला बशर हा आधुनिकीकरणाचा समर्थक होता. तथापि, बशरला वडिलांकडून हुकूमशाहीचा वारसा मिळाला. हाफिजने कठोर राजकीय व्यवस्था आणि लष्करी आणि गुप्तचर सेवांमध्ये निष्ठावंतांचे शक्तिशाली नेटवर्क उभारले होते. बशरचा भाऊ माहेर आणि चुलत भाऊ रामी मखलूफ हे सत्तेचे प्रमुख चेहरे बनले आणि इतरांसोबत देशाची लूट सुरू केली. देश भ्रष्टाचाराचा अड्डा झाला. २०११ मध्ये अरब स्प्रिंग नामी जन उद्रेक सीरियात पोहोचला, तोपर्यंत सीरिया आधीच बशरच्या राजवटीत आर्थिक मंदी, गरिबी आणि दुष्काळाशी झुंजत होता. ५ लाखांहून अधिक लोकांना आपला जीव गमवावा लागला. सीरियन लोकांनी २०११ मध्ये बशरच्या राजवटीच्या विरोधात शांततापूर्ण निदर्शने सुरू केली. ती गृहयुद्धात बदलली. या कालावधीत ५ लाखांहून अधिक लोकांचा मृत्यू झाल्याचा अंदाज आहे.

असादने नियंत्रण राखण्यासाठी आपली सर्व शक्ती वापरली. उघडपणे लोकांवर हवाई हल्ले केले. रासायनिक शस्त्रंदेखील दोनदा वापरली गेली. त्याचा जगभरातून निषेध झाला; परंतु त्याला त्याची पर्वा नव्हती. असादच्या सैन्याने सर्वात मोठे शहर अलेप्पोच्या काही भागांवर नियंत्रण गमावले. त्या वेळी त्याला रशिया आणि इराणने वाचवले होते. २०१६ मध्ये 'एचटीएस'चा म्होरक्या अबू मोहम्मद अल-गोलानी याने 'अल-कायदा'शी संबंध तोडल्यानंतर आणि धार्मिक सहिष्णुता स्वीकारण्याची शपथ घेतल्यानंतर गटाची प्रतिमा पुन्हा तयार करण्याचा प्रयत्न केला. या गटाचे उत्तर-पश्चिम सीरियावर नियंत्रण आहे आणि २०१७ मध्ये या प्रदेशात 'मुक्त सरकार' देखील तयार केले आहे. 'इसिस' सारख्या अतिरेकी गटांचा उदय तसेच अमेरिका, रशिया आणि तुर्कस्तानसारख्या शक्तींच्या परकीय हस्तक्षेपामुळे युद्ध गुंतागुंतीचे झाले होते.

अलीकडे हयात तहरीर अल-शाम (एचटीएस)ने इराण आणि हिजबुल्लाहचे लक्ष इस्रायल विरोधातील संघर्षात लागले आहे तर युक्रेन युद्धात रशिया गुंतल्याचे हेरून बशर विरोधात उठाव केला गेला आणि त्याला सत्तेवरून हटवले. १३ वर्षांच्या भीषण युद्धानंतर अनेक निष्पाप लोकांचे प्राण गमावल्यानंतर आणि प्रचंड मालमत्तेचा नाश झाल्यानंतर सीरियातील बंडखोर गटांनी राजधानी दमास्कसवर कब्जा केला आहे. यासोबतच त्यांनी संपूर्ण देशाला मुक्त घोषित केले आहे. बशरच्या सत्तापतनानंतर राजधानीत उत्सवाचे वातावरण आहे. दमास्कसची काही काळापूर्वी बॉम्बस्फोट आणि गोळ्यांचे आवाज अशी ओळख बनली होती, आता लोक तेथे आनंदोत्सव साजरा करत आहेत. रस्त्यावर गर्दी होत आहे, झेंडे फडकवले जात आहेत आणि लोक स्वातंत्र्याच्या घोषणा देत आनंद व्यक्त करत आहेत.



अशीच दृश्यं देशाच्या इतर भागात विशेषत: लेबनॉन सीमेजवळ दिसली. या उत्सवाने लाखो सीरियन लोकांसाठी आशेचा किरण आणला आहे. ते अनेक वर्षांपासून विस्थापन आणि अस्थिरतेचा सामना करत होते. अनेक विस्थापित नागरिक आता आपल्या घरी परतण्याचा विचार करत आहेत. २०११ मध्ये सीरियात बंडखोरी सुरू झाली, तेव्हा असद सरकारने लोकशाही समर्थक निदर्शने क्रूरपणे चिरडली. हा संघर्ष हळूहळू गृहयुद्धात बदलला. त्यात असद सरकारच्या विरोधात अनेक बंडखोर गट उठले. सरतेशेवटी, या १३ वर्षांच्या संघर्षाने असद राजवट खाली आणली. दमास्कस काबीज करून, बंडखोर गटांनी असद सरकारची केवळ हकालपट्टीच केली नाही, तर सीरियन लोकांना नवप्रारंभ करण्याची संधी दिली आहे.

हा तोच सीरिया आहे, जेथं 'इसिस' या दहशतवादी संघटनेने आपली पाळेमुळे रोवली होती. आता पुन्हा एकदा तोच धोका नाव बदलून निर्माण होऊ नये म्हणजे झालं. हाफिजचा पुतळा पाडून बंडखोर विजयाचा आनंदोत्सोव साजरा करत आहेत; मात्र त्यांच्यासाठी हा धक्का नसल्याचे सीरियन लष्कर सांगत आहे. त्यानुसार त्यांनी काळजीपूर्वक विचार करून एक पाऊल मागे घेतले आहे. सीरियन सैन्य शहराबाहेर पुन्हा तैनात आहे. शहरी युद्ध टाळणे हा त्याचा उद्देश आहे जेणेकरून निष्पाप लोकांचे रक्त सांडू नये. गेल्या १३ वर्षांत बंडखोर एवढ्या वेगाने असादच्या विरोधात पुढे जाण्याची ही पहिलीच वेळ आहे. सीरियात युद्ध सुरू असताना दोन्ही बाजूंनी दहशतवादी संघटना होत्या. एका बाजूला 'अल कायदा'सोबत राहिलेली 'हयात तहरीर अल-शाम' आणि दुसर्या बाजूला 'हिजबुल्लाह' आहे.

त्यामुळे आगामी काळात सीरियात पुन्हा एकदा तोच विध्वंस बघायला मिळाला तर आश्चर्य वाटू नये. या गृह असंतोषाला भूमी राजकीय, वांशिक, धार्मिक अन् पंथभेदाची विशेष करून शिया विरुद्ध सुन्नी असे विविध कांगोरे आहेत. या गुंतागुंतीच्या कांगोर्यानी देश पोखरून टाकला आहे. राष्ट्रीय ऐक्य, एकात्मता, राष्ट्रीय अस्मिता विविध गटांची परस्परविरोधी आहे. त्यामुळे सीरिया खूप मोठा उद्ध्वस्त झाला आहे. असाद यांनी देश सोडल्यानंतर सीरियाच्या पंतप्रधानांनी बंडखोरांच्या हाती सत्ता सोपवण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. पंतप्रधान मोहम्मद गाझी अल जलाली यांनी एका व्हिडिओमध्ये म्हटले आहे, की ते देशातच राहतील आणि सीरियातील लोक ज्याला निवडतील त्यांच्यासोबत काम करतील. बंडखोरांच्या विजयामुळे सीरियातील बशर अल-असद याची २४ वर्षांची राजवट आणि देशातील १३ वर्षांचे गृहयुद्ध संपुष्टात आले, असे (वरकरणी तरी) दिसत आहे.

# मुंबई आमच्याच बापाची आहे .....
# प्रतिमा ताईंचा हा लेख आवर्जून वाचा....

होय, मुंबई आम्ही ६० कोटी ६६ लाख रुपयात विकत घेतलीय - प्रतिमा जोशी. मुंबई नगरी ही पहिल्यापासूनच बहुभाषी असली आणि तिच्या उभारणीत नि जडणघडणीत मराठ्यांसह सर्व प्रांतीयांचा वाटा असला, तरी तिचे अव्वल भौगोलिक स्थान आणि प्राचीनत्व हे निखळ मराठी आणि मराठीच आहे. महाराष्ट्राला गुजरातशी सयामी जुळ्यासारखे जोडून द्वैभाषिक राज्य चालवण्याचा केंद्राचा हेका महाराष्ट्रीयांनी मोडून काढला. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र निर्माण केला. आणि गेली पन्नास वर्षे 'मुंबई कोणाची?' हा प्रश्न सतत ऐरणीवर येत राहिला. मुंबई फक्त मराठ्यांचीच नव्हे तर सगळ्यांची, इथपासून ते 'मुंबई तुमची, भांडी घासा आमची' म्हणण्यापर्यंत कटुता ताणली जात असते. मुंबई हे दक्षिण आशियाचे इकॉनॉमिक हब होण्यापर्यंतची घोडदौड ही परप्रांतीयांच्या भांडवलामुळे झाली असे उदाहरणांसकट मांडले जाते. पैसा, भांडवल हे शब्द नुसते ऐकले तरी मराठी माणसाला विनाकारण हुडहुडी भरते. किंबहुना पैसा आणि मराठी हे दोन विरुध्दार्थी शब्द असल्यागत आपली वाटचाल असते. त्यामुळे भांडवलवाल्या अमराठी माणसांसमोर मराठी माणसे कायम न्यूनगंड घेऊन वावरत असतात. रस्त्यावरच्या राड्यांमागेही हाच न्यूनगंड असतो. पण याच महाराष्ट्राने मुंबईसह स्वतंत्र राज्य म्हणून जन्माला येण्यापोटी गुजरातला चक्क कोट्यवधी रुपये मोजले आहेत, हे फारच कमीजणांच्या गावी असेल. महाराष्ट्र आणि गुजरात अशी दोन स्वतंत्र राज्ये अस्तित्वात येणार ही काळ्या दगडावरची रेघ ठरल्यानंतर राज्यघटनेच्या ७ व्या व ८ व्या परिशिष्टात ...आवश्यक सुधारणा करण्यात आल्या. कलम ४२(२), ४८(१) आणि ५१(५) अनुसार गुजरात राज्याची राजधानी विकसित करण्यासाठी अस्तित्वात असलेल्या राज्याच्या कॅश बॅलन्स इन्व्हेस्टमेंट अकाऊंटमधून १० कोटी रुपये इतकी रक्कम देण्यात यावी असे प्रस्तावित करण्यात आले. त्यानंतर गुजरात राज्याची वार्षिक तूट भरून काढण्यासाठी १९६० साली ६.०२ कोटी रुपयांपासून सुरुवात करून १९६९-७० पर्यंत १.१४ कोटी अशा क्रमाने रकमा द्याव्या....असे ठरले.... याखेरीज १९६२-६३ पासून १९६९-७० पर्यंत ८ आर्थिक वर्षांत गुजरातला २८.३९ कोटी रुपये लाभ व्हावा असाही निर्णय झाला. बॉम्बे रिऑर्गनायझेशन ॲक्ट १९६० च्या कलम ५२खाली महाराष्ट्राने गुजरातला १९६२-६३ साली ६१२ लाख, ६३-६४ साली ५८५ लाख, ६४-६५ साली ५०१ लाख, ६५-६६ साली ५२६ लाख, ६६-६७ साली ४३३ लाख, ६७-६८ साली ३४० लाख, १९६८-६९ साली २०९ लाख असे ३२ कोटी ६६ लाख रुपये दिले.... यात नव्या तरतुदीनुसार दिलेले ३८ कोटी धरून एकूण ६० कोटी ६६ लाख रुपये महाराष्ट्राने गुजरातला दिल्याची नोंद 'द गॅझेट ऑफ इंडिया एक्स्ट्रा ऑर्डिनरी' मध्ये आहे..... याचा अर्थ......मुंबईवरील ताबा राखण्यासाठी महाराष्ट्राला ६० कोटींची किंमत चुकवावी लागली आहे. ..... होय, एका परीने मुंबई आपण विकत घेतलीय..... .....भारतीय स्वातंत्र्याच्या वेळी झालेल्या फाळणीत पाकिस्तानला ५५ कोटी रुपये द्यावे लागले..... त्यावरून आजही एक वर्ग सतत विखारलेला असतो.... इथे तर स्वतंत्र भारतातीलच एका राज्याने दुसऱ्याला ही किंमत मोजली आहे..... .... या मुंबईत कामगार... चाकरमानी.... कारकून.. कष्टकरी.... आणि निर्धन बुद्धिवादी इतकीच ओळख... असलेल्या मराठी माणसाला कोणताच न्यूनगंड बाळगण्याची गरज नाही...... ....मुंबईसह महाराष्ट्र अस्तित्वात आणण्यासाठी १०६ हुतात्म्यांचे रक्त तर आपण सांडले आहेच.... पण ६० कोटी ६६ लाख रुपयेही मोजले आहेत..... .... हि महत्वाची माहिती जास्तीतजास्त पसरून आमची मुंबई म्हणणाऱ्यांचे तोंड बंद करा...... ....मुंबई आमची म्हणणाऱ्या गुजराती लोकांनी हा लेख वाचावा... कारण हा लेख मुंबई बाबत महाराष्ट्र आणि गुजरात मधल्या व्यवहाराचा आहे...... पाकिस्तान देश नवीन वसवताना ५५ कोटी दिले ते अखंड भारताने दिले होते येथे गुजरात राज्य उभारणी साठी महाराष्ट्र राज्यातील सरकारने ६० कोटी दिले होते हे विसरून गेले

******

.... जय महाराष्ट्र....

# 'एमएसपी'ला कायदेशीर मान्यता?



शेतात न वाढणारे उत्पन्न, वाढता खर्च, कर्ज, जोडीला अपुरी किंवा अल्प कार्यक्षम विपणन प्रणाली ही कृषीविषयक काही चिंतेची कारणे आहेत, असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या समितीने नोंदविले आहे.

हरियाणा आणि पंजाबच्या शंभू सीमेवर निदर्शने करणार्या शेतकर्यांच्या तक्रारी दूर करण्यासाठी पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश नवाब सिंग यांच्या नेतृत्वाखाली ही उच्चस्तरीय समिती गठित करण्यात आली होती. या समितीने आपला अंतरिम अहवाल सादर केला आहे. शेतकर्यांच्या कर्जमुक्तीसाठी किमान आधारभूत किमतीला (एमएसपी) कायदेशीर मान्यता देणे आणि त्यायोगे शेतकर्यांना थेट आर्थिक साहाय्य देण्याची शक्यता तपासून पाहणे असे उपाय या समितीने सुचवले आहेत. एमएसपी (मिनिमम सपोर्ट प्राइज) म्हणजे किमान आधारभूत किंमत. भारतात हा एक सरकार-निर्धारित किमतीचा स्तर आहे ज्यामुळे शेतकर्यांना त्यांच्या उत्पादनाची किमान किंमत मिळण्यास मदत होते. कायदेशीर अधिकार म्हणून एमएसपी हा अर्थव्यवस्थेसाठी फायदेशीर आहे. एमएसपी भारतातील शेतकर्यांसाठी एक प्रकारे सुरक्षा कवच प्रदान करतो. शेतकरी त्यांचे पीक तोट्यात विकत नाहीत याची हमी देण्यासाठी उत्पादन खर्च विचारात घेतले जाते. त्यासाठी शेतकर्यांना सरकारी खरेदीचा पर्याय खुला होतो, ज्यामुळे मध्यस्थांना तितकासा गाळा प्राप्त करण्याची संधीच मिळत नाही आणि लागवडीपूर्वी किमान किंमत निश्चित केली गेली असल्याने शेतमालाच्या विक्रीची खातरजमा होते. कायदेशीर बंधनकारक एमएसपी म्हणजे कोणीही एमएसपीपेक्षा कमी शेतमाल खरेदी करू शकत नाही. आंतरपीक किमतीची समानता, उत्पादन खर्च, पुरवठा मागणी आणि इतर घटकांचा विचार करून एमएसपीची गणना केली जाते. तसे पाहिल्यास, जर शेतकरी कृषी व संलग्न क्षेत्राद्वारे पर्याप्त आर्थिक स्वावलंबी बनले तर भारतीय अर्थव्यवस्थेसाठी ही अतिशय जमेची बाजू ठरू शकते. किंमत स्थैर्यामुळे देशाची एकूण अन्नसुरक्षा वाढेल आणि शेतकरी त्यांच्या उत्पन्नात वाढ झाल्याने कृषी उत्पादनासाठी अधिक गुंतवणूक करू शकतील. त्यामुळे सरकार सध्या २३ पिकांसाठी किमान आधारभूत किमती (एमएसपी) प्रदान करते. मात्र काही अर्थशास्त्रज्ञांनी अशा योजनेच्या दीर्घकालीन व्यवहार्यतेवर प्रश्नचिन्ह उभे केले आहेत.

# दोन करोड रुपयाची खंडणी मागितल्या प्रकरणी वाल्मीक कराड,विष्णू चाटे ,सुदर्शन घुले यांच्या विरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल




केज/प्रतिनिधी दोन करोड रुपयाची खंडणी मागितल्या प्रकरणी वाल्मीक कराड,विष्णू चाटे ,सुदर्शन घुले यांच्या विरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, सुनील केदु शिंदे वय ४२ वर्षे व्यवसाय खाजगी नोकरी, रा. द्वारका रेसिडेन्सी उपनगर पोलीस ठाण्याच्या मागे द्वारका नाशिक रोड नाशिक ह. मु. मुंढा रोड बीड यांनी पोलीस ठाणे केज येथे हजर होऊन तोंडी सांगितले की, मी वरील ठिकाणचा राहणारा असून मागील एक वर्षापासून अवादा एनर्जी प्रायव्हेट लिमिटेड कंपनीत प्रकल्प अधिकारी म्हणून काम पाहत आहे. माझ्याकडे बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील विविध ठिकाणी पवन ऊर्जा प्रकल्पाचे मांडणी व उभारणीचे काम आहे. मस्साजोग या ठिकाणी प्रकल्पाचे मुख्य कार्यालय असून त्या ठिकाणी माझ्यासोबत विविध प्रकल्पाचे अधिकारी काम पाहत आहेत. माझे सहकारी शिवाजी नाना थोपटे हे जमीन अधिग्रहण विभागाचे काम पाहतात. आमच्या पवन ऊर्जा प्रकल्पाचे प्रमुख म्हणून श्री सतीश कुमार हे महाराष्ट्रात काम पाहत आहेत. दिनांक २९ नोव्हेंबर २०२४ रोजी १०-०० वाजण्याच्या समरस मी मस्साजोग येथील अवदा एनर्जी प्रकल्पाच्या कार्यालयात हजर असताना माझ्या मोबाईल दूरध्वनी क्र. ७३०३०९३०४५ या दूरध्वनी नंबर वर विष्णू चाटे यांचा मोबाईल दूरध्वनी क्र. ९७६३७३६५७७ या दूरध्वनी क्रमांकावरून फोन आला व त्यांनी मला वाल्मीक अण्णा बोलणार आहेत असे म्हणाले, अरे ते काम बंद करा ज्या परिस्थितीमध्ये सुदर्शनने सांगितले आहे, त्या परिस्थितीत काम बंद करा, अन्यथा त्याचे परिणाम गंभीर होतील, काम चालू केले तर याद राखा असे म्हणून प्रकल्पाचे काम बंद करण्याबाबत धमकी दिली. मी व शिवाजी थोपटे असे कार्यालयात हजर असताना दुपारी २-३० वाजण्याच्या सुमारास सुदर्शन घुले राहणार टाकळी हा आमच्या मस्साजोग येथील प्रकल्पाच्या ठिकाणी आला व त्यांनी पुन्हा काम बंद करा, अन्यथा जिम मागणी यापूर्वी केलेली आहे त्याची पूर्तता करा असे म्हणून केज मध्ये चालू असलेल्या इतर ठिकाणचे अवदा कंपनीचे सर्व काम बंद करा अन्यथा तुमचे हात पाय तोडून तुमची कायमची वाट लावून टाकील असे म्हणून धमकी दिली होती. काही दिवसापूर्वी शिवाजी थोपटे यांना वाल्मीक अण्णा कराड यांनी त्यांचे परळी येथील कार्यालयात बोलावून अवता कंपनीचे केज तालुक्यातील सर्व काम बंद करा अन्यथा काम चालू ठेवायचे असेल तर दोन करोड रुपये द्या असे सांगितले होते. त्यानंतर वेळोवेळी विविध लोकांच्या मोबाईल वरून प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या प्रकल्पाचे काम बंद न ठेवल्यास मारहाण करण्याच्या व जीवे मारण्याच्या धमक्या दिलेल्या आहेत. यापूर्वी दिनांक २८ मे २०२४ रोजी ११-०० वाजण्याच्या सुमारास याच कारणावरून माझे आपहरण केलेले होते त्याबाबत मी पोलीस ठाणे येथे तक्रार दिली होती. त्यावरून पोलीस ठाणे केज येथे गु.र.नं.२८५/२०२४ अनुसार गुन्हा दाखल आहे तसेच दिनांक ६ डिसेंबर २०२५ रोजी देखील सुदर्शन घुले व इतर यांनी आवाजा कंपनीचे मस्साजोग येथील प्रकल्पाच्या ठिकाणी जबरदस्तीने प्रवेश करून गेटवरील कामगारांना धमकी देऊन मारहाण केली होती. त्यावेळी आमचे कंपनीचे शिवाजी थोपटे यांनी सुदर्शन घुले व इतर लोकांविरुद्ध पोलीस ठाणे केज येथे तक्रार दिल्याने गुन्हा दाखल झालेला आहे. तरी मी काम करत असलेल्या अवदा कंपनीचे केज तालुक्यातील पवन ऊर्जा प्रकल्पाचे काम बंद करण्यासाठी वाल्मीक करा राहणार परळी तालुका परळी विष्णू चाटे राहणार कोडगाव तालुका केज व सुदर्शन घुले राहणार टाकळी तालुका केज जिल्हा बीड हे वारंवार प्रकल्पाचे काम चालू झाल्यापासून धमकी देत आहेत. त्यामुळे मी त्यांच्या दहशतीखाली असल्याने व माझी मनस्थिती बरोबर नसल्याने मी आमच्या कंपनीचे वरिष्ठ अधिकारी यांच्याशी चर्चा करून त्यांच्या सल्ल्याने दिनांक ११ डिसेंबर २०२४ रोजी रोजी उशिराने तक्रार देत आहे. असे सुनील केदु शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. वाल्मीक कराड, विष्णू चाटे, सुदर्शन घुले यांच्याविरुद्ध केज पोलीस ठाण्यात गु.र.नं.६३८/२०२४ अधिनियम भारतीय न्याय संहिता (बी एन एस), २०२३ कलम ३०८(२), ३०८(३), ३०८(४), ३०८(५), ३(५) नुसर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरेश बनसोडे हे करत आहेत.

# भाजपा युवा नेते ऋषिकेश कराड यांनी भीषण अपघातातील कारेपूरच्या जखमींची भेट

लातूर :- अंबाजोगाई शहरापासून जवळ असलेल्या वाघाळा पाटी जवळ काल मंगळवारी झालेल्या कार आणि ट्रकच्या भीषण अपघातातील रेणापूर तालुक्यातील मौजे कारेपूर येथील जखमी दोघा रुग्णांची भाजपाचे युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांनी लातूर येथील रुग्णालयात जाऊन अस्थेवाईकपणे चौकशी केली व दिलासा दिला.



अंबाजोगाई कारखाना नजीक वाघाळा पाटीजवळ कारचा आणि ट्रकचा भीषण अपघात झाला या अपघातात रेणापूर तालुक्यातील मौजे कारेपूर येथील बालाजी माने, दिपक सावरे, कृतवीक गायकवाड, फारुक शेख या चौघांचे दुर्दैवी दुःखद निधन झाले तर शेख मुबारक आणि शेख अजीम या दोघांना अंबाजोगाईच्या स्वाराती रुग्णालयात उपचार करून पुढील उपचारासाठी लातूर येथील पोद्दार हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आले आहे. सदरील घटनेची माहिती मिळल्याने भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेश सचिव युवा नेते ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी आज बुधवारी दुपारी लातूर येथील पोद्दार हॉस्पिटल येथे जाऊन जखमी शेख मुबारक आणि शेख अजीम या दोघा रुग्णांची भेट घेवून घटनेची सविस्तर माहिती जाणून घेतली व दिलासा दिला. त्याचबरोबर उपचार करणाऱ्या संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांशी चर्चा करून प्रकृतीची विचारपूस केली. यावेळी जखमी रुग्णांचे नातेवाईक जिल्हा परिषदेचे माजी सदस्य सुरेंद्र गोडभरले, भाजपाचे भाऊसाहेब गुळबिले यांच्यासह इतर अनेक जण होते.

# खासदार रजनीताई पाटील यांनी नालीच्या कामासाठी निधी दिल्याबद्दल हारूणभाई इनामदार यांनी मानले आभार

केज/प्रतिनिधी केज शहरातील समर्थ नगर भागातील नालीचा प्रश्न तब्बल दहा वर्षांनी नगरपंचायतने मार्गी लावल्याबद्दल नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे तर खासदार रजनीताई पाटील यांनी पाठपुरावा करून नालीच्या कामासाठी निधी दिल्याबद्दल हारूणभाई इनामदार यांनी आभार मानले. शहरातील पारस स्वीट होम पासून फलोउत्पादनाच्या जागेलगत समर्थ नगर भागातून जाणाऱ्या मोठ्या नाल्याचा प्रश्न हा गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित होता. सदर नाल्याच्या घाण पाण्यामुळे व दुर्गंधीमुळे या भागातील नागरिक त्रस्त झाले होते परंतु या भागाचे नगरसेवक आदित्य दादा पाटील आणि नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड व जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारूणभाई इनामदार यांनी वेळोवेळी पाठपुरावा करून खासदार रजनीताई पाटील यांनी या कामासाठी निधी दिला आहे म्हणून या भागातील नाल्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागला आहे. माध्यमाशी बोलताना या भागातील नागरिक म्हणाले की, गेल्या दहा ते पंधरा वर्षापासून या नाल्याचे काम रखडले होते परंतु नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड, आदित्य दादा पाटील आणि हारुणभाई इनामदार यांनी वेळोवेळी पाठपुरावा करून नाल्याचे



काम केल्याबद्दल आम्ही सर्वांचे आभार मानतो आमच्या या भागातील महत्त्वाचा प्रश्न मार्गी लागला असल्यामुळे आम्ही समाधानी आहोत असे मत व्यक्त केले तर माध्यमांशी बोलताना त्यांनी यावेळी माध्यमांशी बोलताना हारूणभाई इनामदार म्हणाले की, देशाच्या खासदार रजनीताई पाटील, या भागाचे नगरसेवक आदित्य दादा पाटील नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड आणि या भागातील सर्व जुने जागा मालक व या भागातील नागरिकांनी आम्हाला सहकार्य केले त्यामुळेच या नाल्याचा प्रश्न मार्गी लागला आहे. पुढे बोलताना इनामदार म्हणाले की, या कामासाठी खासदार रजनीताई पाटील यांनी निधी उपलब्ध करून दिला व वेळोवेळी आदित्य दादा पाटील यांनी पाठपुरावा केला त्याचबरोबर या कामाचे गुत्तेदार प्रवीण शेठ शेप यांनी देखील सदरचे काम उत्कृष्ट केले आहे व या भागातील सर्व जागा मालकांनी मोलाचे सहकार्य केले व या भागातील नागरिकांनी देखील मोठे सहकार्य केले आहे त्याबद्दल सर्वांचे त्यांनी आभार व्यक्त केले आहे. यावेळी जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार, नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड,नगरसेविका सौ. पद्मनाका शिंदे यांच्यासह समर्थ नगर भागातील युवक व नागरिक उपस्थित होते.

# धाराशिव शहरास सुरत चेन्नई महामार्गास स्पर रोड लवकरच मंजूर -खा ओम राजे

धाराशिव / प्रतिनिधी :- धाराशिव जिल्हयातून केंद्र सरकारच्या महत्वकांक्षी प्रकल्पापैकी एक असलेला सुरत - चेन्नई ग्रीन कॉरीडॉर हा महत्वाचा महामार्ग आहे. सदर महामार्ग सुरत - चेन्नई असा असून हा महामार्ग धाराशिव जिल्हयातून जात असून धाराशिव शहरापासून साधारणत: ३५ किमी अंतरावर वैराग ता. बार्शी जि. सोलापूर येथे या महामार्गास केनक्टीवीटी देणेबाबत अनेक दिवसापासून खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी पाठपुरावा व पत्र व्यवहार व्दारे मा. नितीनजी गडकरी साहेब यांच्याकडे स्पर रोड कनेटीवीटीची मागणी केली होती. धाराशिव लोकसभा मतदार संघातील वैराग ही मोठी बाजारपेठ असून या स्पर कनेक्टीवीटीमुळे धाराशिव शहर या महामार्गाशी जोडले जाणार आहे.

लोकसभेच्या प्रश्न उत्तराच्या तासामध्ये प्रश्न क्रमांक २४५ नुसार जिल्हयातील विविध महामार्गाच्या अनुषंगाने खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी रस्ते व वाहतुक मंत्री मा. ना. श्री. नितीनजी गडकरी यांना प्रश्न विचारुन धाराशिव जिल्हयातून जाणारा सुरत -चेन्नई महामार्गास स्पर रोड कनेक्टीवीटी मंजुर करु असे म्हटले आहे. लोकसभेमध्ये खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी विचारलेल्या प्रश्नास उत्तर देताना लोकसभेमध्ये माहिती दिली.

# मनपा शाळातील ९६५ विद्यार्थ्यांना स्पोर्ट ड्रेस वाटप



लातूर/प्रतिनिधी :- लातूर शहर महानगरपालिका अंतर्गत असणाऱ्या १६ शाळातील ९६५ विद्यार्थ्यांना स्पोर्ट ड्रेस देण्याचे निर्देश मनपा आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी दिले होते. त्यानुसार आज सदरील स्पोर्ट ड्रेस चे वाटप उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांच्या हस्ते करण्यात आले.मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना इतर शाळेतील विद्यार्थ्यांप्रमाणे सुविधा मिळाव्या असा पालिकेचा प्रयत्न आहे. त्या अनुषंगाने हे स्पोर्ट ड्रेस वाटप करण्यात आले.यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.यावेळी सहाय्यक आयुक्त निर्मला माने,शिक्षणाधिकारी साहेबराव जाधव, भांडारपाल बालाजी शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# परभणी येथे समाज कंटकावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून, सखोल चौकशी करून कठोर कार्यवाही करावी काँग्रेस पक्षाकडून जिल्हाधिकारी वर्षा घुगे ठाकूर यांना निवेदन

लातूर / प्रतिनिधी :- परभणी येथे एका समाजकंटकाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधान प्रतिमेची केलेली विटंबना ही अत्यंत निंदनीय घटना असून, या घटनेचा तीव्र निषेध करण्यात आला आहे. यासंदर्भात लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी व लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभागाने आज जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर येथे जिल्हाधिकारी वर्षा घुगे ठाकूर यांची भेट घेऊन या घटनेमागे जे कोणी सुत्रधार असतील त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून त्यांची सखोल चौकशी करून कठोर कार्यवाही करण्यात यावी, असे निवेदन दिले. यावेळी काँग्रेस पदाधिकारी यांनी निवेदनाव्दारे, परभणी येथे घडलेल्या या अमानवी कृत्यामागे जे कोणी सुत्रधार असतील त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून त्यांची सखोल चौकशी करून कठोर कार्यवाही करण्यात यावी. या घटनेमुळे समाजात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, या प्रकारच्या घटना पुन्हा घडू नयेत यासाठी प्रशासन कठोर पावले उचलणार असल्याची ग्वाही द्यावी. समाजातील सामाजीक सलोखा, शांतता बिघडवणाऱ्या अशा घटना घडू नयेत, महापुरुष आणि लोकशाहीच्या प्रतिकांचा देखील अपमान व्हायला नको, याकरीता काँग्रेस पक्षाच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन सरकारचे लक्ष वेधण्यात यावे अशा सुचना राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी पदाधिकाऱ्यांना दिल्या. या अनुषंगाने लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटी व लातूर



शहर जिल्हा काँग्रेस कमिटी अनुसूचित जाती विभागाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर येथे जिल्हाधिकारी वर्षा घुगे - ठाकूर यांची भेट घेऊन निवेदन दिले. या निंदनीय कृत्याचा निषेध करत काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करत संविधानाचे रक्षण करण्याचा संकल्प व्यक्त केला. यावेळी लातूर शहर काँग्रेस कमिटी मधील माजी नगरसेवक व निराधार विभागाचे अध्यक्ष असिफजी बागवान, सोशल मीडियाचे जिल्हाध्यक्ष प्रवीण सूर्यवंशी, प्रदेश पदाधिकारी संजय ओव्हाळ, प्रभाग अध्यक्ष ड. विजय गायकवाड, सीराज शेख, राजू गवळी, फारुख शेख, बिबीशन सांगवीकर, पिराजी साठे, ड. गणेश कांबळे, कुणाल शृंगारे, असलम चाऊस, नितीन कांबळे, काशिनाथ वाघमारे, अशोक सूर्यवंशी, अक्षय मुरुळे, दयानंद कांबळे, मंगेश वैरागे, किरण बनसोडे, अजित सूर्यवंशी, संजय देडे, मारुती चव्हाण, आनंद बनसोडे तसेच मागासवर्गीय विभागाचे शहराध्यक्ष प्रा. प्रवीण कांबळे इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.

# मृत महिलेच्या हातातील बांगड्या चोरल्या

मुंबई : प्रतिनिधी कुर्ल्यातील भीषण बस अपघातात ७ जणांचा मृत्यू झाला असून ४९ जण जखमी झाले आहेत. अपघातातील एका मृत महिलेच्या हातातील बांगड्या चोरीला गेल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. हा प्रकार मोबाईलमध्ये कैद झाला असून व्हीडीओ व्हायरल झाला आहे.

दरम्यान, ९ डिसेंबर रोजी रात्री कुर्ल्यात बसचा भीषण अपघात झाला. ड्रायव्हरने ३०-४० गाड्यांना धडक देत काही नागरिकांनाही चिरडले. यामध्ये आत्तापर्यंत ७ जणांचा मृत्यू झाला. या प्रकरणात आरोपी संजय मोरे याला पोलिसांनी अटक केली आहे.

याचदरम्यान माणुसकीला काळिमा फासणारी एक घटनाही त्या अपघाताच्या ठिकाणी घडली. बस अपघातानंतर जखमी झालेल्या नागरिकांच्या मदतीसाठी आजूबाजूचे लोक धावले खरे पण तेथेच गाडीखाली सापडून मृत्यूमुखी पडलेल्या एक महिलेसोबत अतिशय धक्कादायक घटना घडली. त्या मृत महिलेचा गाडीखाली चेंदामेंदा झालेला असतानाच तिच्या हातातील सोन्याच्या बांगड्या काढून घेतल्याचे उघड झाले आहे. अतिशय खालच्या थराची, माणुसकीला लाजवणारी ही घटना मोबाईलमध्ये कैद झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कन्नीस अन्सारी ( वय ५५) असे त्या महिलेचे नाव असून कुर्ला बेस्ट अपघातात गाडीखाली सापडल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. मात्र मृत्यूनंतर त्यांचा मृतदेह बाहेर काढायचा सोडून कोणीतरी त्यांच्या हातातल्या सोन्याच्या बांगड्याच काढून घेतल्या.

# सीसीआयचे कापूस खरेदी केंद्र सुरू होईना; योग्य भाव मिळेना, हमी भावापेक्षा कमी भावाने खासगी व्यापाऱ्यांकडून कापूस खरेदी

## २६ दिवसांपासून खरेदी केंद्र बंदच

किनवट येथे भारतीय कापूस महामंडळ (सीसीआय) चे खरेदी केंद्र मंजूर आहे. जिल्ह्यात १३ नोव्हेंबरला काही ठिकाणी सीसीआयने खरेदी सुरू केली. पण २६ दिवसांचा कालावधी लोटत आला तरी किनवटच्या मंजूर सीसीआयचे खरेदी केंद्र सुरू झाले नाही. त्यामुळे याचा पुरेपूर फायदा घेऊन खासगी व्यापारी शासनाच्या हमी भावापेक्षा कमी भावाने तेही ओलावा आहे म्हणून कट्टी करून शेतकऱ्यांची जणू काही लूटच चालवली आहे.

याबाबत छत्रपती संभाजीनगरच्या सीसीआयचे स्वप्नील दडमल यांच्याशी संपर्क साधला असता लवकरात लवकर सीसीआयचे स्वरेदी केंद्र सुरू करण्याचा प्रयत्न सुरू असून, परवानगी येताच टेंडर काढून खरेदी करण्याचा माझा प्रयत्न असल्याचे त्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

किनवट/शेख शौकत :-किनवट तालुक्याचे मुख्य आणि नगदी पीक पांढरे सोने म्हणविल्या जाणारे कापूस असले तरी शासनाच्या भारतीय कापूस महामंडळ (सीसीआय) किनवट तालुक्यात अद्याप खरेदी केंद्र सुरू झाले नाही. खरेदी केंद्र मंजूर असतानाही सीसीआयचे केंद्र सुरू न झाल्याने खासगी व्यापारी गरजवंत शेतकऱ्यांचा कापूस हमी भावापेक्षा कमी दराने खरेदी करत आहेत. त्यातच ओलावा आहे म्हणून कट्टी करून खरेदी करीत असल्याने ही लूट थांबवण्यासाठी कॉटन कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (सीसीआय) खरेदी केंद्र कधी सुरु करणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे. शेतकऱ्यांचा कापूस खासगी व्यापाऱ्यांच्या घशात जात असतानाही सीसीआयला खरेदी केंद्र सुरू करण्याचा मुहूर्त सापडला नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. काही शेतकरी सीमावर्ती तेलंगणाच्या



आदिलाबाद या प्रसिद्ध कापूस बाजारपेठेत नेऊन विक्री करत आहे. वाहतुकीचा खर्च जाता बाकी शेतकऱ्यांना परवडत नसले तरी नाइलाज असल्याचे शेतकरी बोलत आहेत. विदर्भ, तेलंगणाच्या सीमेवर मराठवाड्याच्या शेवटच्या टोकाला नांदेड जिल्हा मुख्यालयापासून दीडशे किलोमीटर अंतरावर किनवट हा आदिवासी तालुका असून, शेतकऱ्यांचे मुख्य पीक हे कापूस आहे. खरीप हंगाम २०२४-२५ मध्ये कापूस या पिकाचे ५१ हजार ७७४ हेक्टर क्षेत्र असून, यावर्षी पावसाळ्यात झालेल्या अतिवृष्टी, पूरपरिस्थितीमुळे उताऱ्यावर मोठा परिणाम झाला आहे. हेक्टरी साधारणपणे १५ क्विंटल उतारा आल्याने ७ लाख ७६ हजार ६१० क्विंटल उत्पादन आले आहे. कापूस उत्पादक शेतकरी सुभाष कयापाक यांना खासगी कापूस खरेदीबाबत कमी भावाने खरेदी केल्यास शासन गुन्हे दाखल करण्याची पोकळ घोषणा करते. मात्र, घोषणा करून चालणार नाही तर हमी भावापेक्षा कमी भावाने खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यावर गुन्हे दाखल करण्याचा कायदा बनवा, अशी मागणी केली.

# विवेक सौताडेकर यांची 'ग्रामीण शब्दकोश निर्मिती' मंडळावर निवड

लातूर :- मराठवाडा साहित्य परिषद , छत्रपती संभाजी नगर येथील नूतन केंद्रीय कार्यकारिणीची पंचवार्षिक निवडणूक ९ नोव्हेंबर रोजी पार पडली. या निवडणुकीत प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांच्या 'संस्था संवर्धन पॅनल' चे २२ नवनिर्वाचित सदस्य निवडून आले. या कार्यकरणीची पहिली बैठक रविवार दि. २४ नोव्हेंबर २०२४ रोजी संपन्न झाली.

या बैठकीत मराठवाडा प्रदेश मराठी भाषेचे उगमस्थान असून या प्रदेशातील मराठी भाषा ही मूळ व मध्यवर्ती भाषा आहे. कालपरत्वे तिची रूपे बदलत गेली. आजची मराठी भाषा आणि पूर्वीची मराठी भाषा यात आज बरेच अंतर निर्माण झाले आहे, ते होतच असते. मराठीची मूळ नानाविध शब्दरूपे आजही ग्रामीण भागातील लोकजीवनात आढळताना दिसतात. परंतु ग्रामीण बोली भाषेतील हे जुने अनेक शब्द काळानुरूप लोप पावत आहेत. ते पुढील पिढ्यांसाठी जतन व संवर्धन करण्यासाठी ग्रामीण बोलीतील शब्दांचा आजच्या अर्थासहित एक शब्दकोश तयार करावा असा मराठवाडा साहित्य परिषदेचा मानस आहे. साहित्य परिषदेच्या दृष्टीने भाषा संचिताचे हे काम अत्यंत महत्त्वाचे असून साहित्य परिषदेचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. त्यासाठी मराठवाड्यातील तज्ज्ञ लोकांना घेऊन मराठवाडास्तरीय 'ग्रामीण शब्दकोश समिती'ची निर्मिती करण्यात आली आहे.

ही निवड पाच वर्षासाठी असून हा प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी 'ग्रामीण शब्दकोश समिती'चे सदस्य म्हणून मराठवाडा साहित्य परिषद शाखा लातूरचे सदस्य व साहित्यिक विवेक सौताडेकर यांची परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील, उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, डॉ. आसाराम लोमटे, कोषाध्यक्ष डॉ.रामचंद्र काळुंखे, कार्यवाह डॉ. दादा गोरे आदींनी बिनविरोध निवड केली आहे.



गेल्या पंचवीस वर्षापासून मराठी साहित्यात योगदान देणाऱ्या विवेक सौताडेकर यांचे 'लातूर: काल आणि आज', 'मातीतील मोती' , 'महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर : चरित्र आणि विचारधन', 'गोजन प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराज', 'झिंगणेश्वर स्वामी' अशी एकूण १४ पुस्तके प्रकाशित असून तीसहून अधिक शासकीय व अशासकीय ग्रंथ, गौरवग्रंथ, विशेषांकाचे त्यांनी संपादन केले आहे. सौताडेकर हे लातूर जिल्हा शासकीय इतिहास संशोधक मंडळाचे सदस्य असून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई, संत कबीर प्रतिष्ठान, शारदोत्सव व्याख्यानमाला अशा अनेक समित्यांचे ते पदाधिकारी आहेत.ग्रामीण शब्दकोश निर्मितीच्या निवडीच्या अनुषंगाने त्यांचे रामचंद्र तिरुके, डॉ. जयद्रथ जाधव, रामचंद्र मदने तसेच समाजाच्या विविध स्तरातून त्यांचे स्वागत होत आहे.

# दिवंगत गोपीनाथराव मुंडे यांच्या जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रम



अहमदपूर / प्रतिनिधी :- लोकतेने दिवंगत गोपीनाथरावजी मुंडे यांच्या जयंती निमित्त सामूहिक अभिवादन करण्यात आले. सूरूवातीला पंचायत समितीचे माजी सभापती अशोकराव केंद्रे आणि माजी नगरसेवक संतोष शेफ यांच्या हस्ते गोपीनाथराव मूंडे यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. तस सम्याट मित्रमंडळाचे अध्यक्ष माजी नगरसेवक डॉ.सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांच्या हस्ते चौकाच्या नामफलकाला पुष्पहार अर्पण करण्यात आला.त्या नंतर सामूहिक पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक संतोष शेप,माजी सभापती अशोकराव केंद्रे,संतोषभाऊ शेप,माजी उपसभापती बालाजी गुट्टे,बाजार समितीचे संचालक यशवंत केंद्रे, हरिराम गुट्टे, एकनाथ कराड, सचिन केंद्रे, प्रल्हाद इप्पर, सरपंच शरद मुंढे,सुधीर गुट्टे,वंजारी सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष गणेश मुंढे,सचिन बानाटे,आकाश पवार आदींची उपस्थिती होती.

# जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने बघा : डॉ. संतोष पाटील गोराडखेडेकर

वाशिम / प्रतिनिधी :- आयुष्यात जीवन जगत असताना जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने बघितले पाहिजे व जीवनाचा आनंद घेतला पाहिजे असे प्रतिपादन सुप्रसिद्ध व्याख्याते, लेखक व समुपदेशक डॉक्टर संतोष पाटील गोराडखेडेकर यांनी केले आठ डिसेंबर रविवार या रोजी रुठरी जिल्हा वाशिम येथे त्यांच्या व्याख्यानाचे व मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळेस तेथील स्वामी समर्थ केंद्रात बोलताना पाटील यांनी सांगितले की माणसाने वैज्ञानिक दृष्टिकोनाने अध्यात्माकडे बघितले पाहिजे व अध्यात्माची व विज्ञानाची सांगड घातली पाहिजे म्हणजे आपल्या आयुष्य सुखी व आनंदीपणे जगता येईल विज्ञानासोबत अध्यात्माचे जोड लावल्यास निश्चितच आपल्याला आयुष्यात आनंद मिळेल असे त्यांनी बोलून दाखवले यावेळेस हेमंत देशमुख, अंजली सिनकर, शिंदे सर यांनी सुद्धा मार्गदर्शन केले याप्रसंगी पाचोरा येथील रेखा ताई पाटील, सुवर्ण सिंग राजपूत, हर्षल चित्ते, विश्वजीत पाटील सर, आशाताई शिंदे, संगीता पाटील, अनिता सिनकर हे उपस्थित होते कार्यक्रम



यशस्वी होण्यासाठी निखिल बोरकर, डॉक्टर रवी पाटील, कुंदन अरु व स्वामी समर्थ सेवक वाशिम जिल्ह्याच्या टीमने परिश्रम घेतले.

# डॉ सितम सोनवणे यांची डिजिटल मीडियाच्या जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल विनोद खटके यांच्या हस्ते सत्कार



लातूर :- व्हाईस ऑफ मिडिया डिजिटल मिडिया विंगच्या लातूर जिल्हाध्यक्षपदी डॉ.सितम सोनवणे यांची निवड झाल्याबद्दल वंचित बहुजन आघाडीच नेते विनोद खटके यांच्या हस्ते शाल, बुके देऊन सत्कार करण्यात आला यावेळी महेंद्र बनसोडे, रवी कुरिल, संदीप बानाटे, महाविर कांबळे, मयुर सोनवणे आदी मान्यवर उपस्थित होते.

# देशातील पहिली ग्रामपंचायत (मारकवाडी) येथील ग्रामस्थांनी लोकशाही - संविधान जिवंत ठेवण्यासाठी बॅलेट पेपरवर निवडणूका घेण्याची मागणी

*देशातील पहिली ग्रामपंचायत (मारकवाडी) येथील ग्रामस्थांनी लोकशाही - संविधान जिवंत ठेवण्यासाठी बॅलेट पेपरवर निवडणूका घेण्याची मागणी




सोलापूर / प्रतिनिधी :- मारकवाडी येथील ग्राम पंचायत व ग्रामस्थानी लोकशाई आणि संविधान जिवंत ठेवण्यासाठि व तसेच संविधानाच्या रक्षणासाठि जो क्रांतीकारी निर्णय घेऊन या पुढे देशात बॅलेट पेपर वर निवडणुका झाल्या पाहिजेत, अश्या प्रकारचे आदर्श समाजासमोर ठेवला यानिर्णयाचे स्वागत करण्यासाठी भिमशक्ती सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तथा राज्य सभेचे खासदार: चंद्रकांत हंडोरे यांच्या आदेशानुसार पश्चिम महाराष्ट्राचे सरचिटणीस राजाभाऊ कदम, इंदापूरचे तालुका अध्यक्ष युवराज पोळ मामा व त्याचे चिरंजीव सम्राट पोळ व तेथिल समस्थ ग्रामस्थ आणि सरपंच रंजीत मारकड व इतर सदस्य यांच्याशी चर्चा केली व सर्वांनी क्रांतिकारी निर्णय घेतला त्या समस्त ग्रामास्थाचे जाहीर अभार व त्यांच्या पुढिल वाटचालीस शुभेच्छा..!.

# क्वांटम कॉम्प्युटिंग: ई-कॉमर्सच्या भविष्याला नवे पंख

ई-कॉमर्सने खरेदीच्या पद्धतींमध्ये अभूतपूर्व बदल घडवून आणले आहेत, परंतु आता तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे हा उद्योग क्वांटम कॉम्प्युटिंगच्या क्रांतीसाठी सज्ज आहे. पारंपरिक कॉम्प्युटरच्या मर्यादांवर मात करणाऱ्या या तंत्रज्ञानामुळे डेटा प्रक्रियेमध्ये अभूतपूर्व वेग व अचूकता मिळते. क्वांटम कॉम्प्युटिंगचे क्विबिट्स सुपरपोजिशन व एनटँगलमेंटच्या मदतीने अनेक स्थितीत कार्य करू शकतात, ज्यामुळे ई-कॉमर्समध्ये अत्यंत वैयक्तिक अनुभव, पुरवठा साखळीचे अनुकूलन, आणि जलद शोध यासारख्या प्रगत सेवा देता येतील. क्वांटम कॉम्प्युटिंगमुळे ग्राहकांच्या खरेदी सवयींचे अत्याधुनिक विश्लेषण करून वैयक्तिक उत्पादन शिफारशी तयार केल्या जातील. पुरवठा साखळीत वेळेची व खर्चाची बचत करून डिलिव्हरीची कार्यक्षमता वाढवता येईल. त्याचबरोबर, सायबरसुरक्षेतही मोठी सुधारणा होईल, जसे की व्यवहार सुरक्षित ठेवण्यासाठी क्वांटम-प्रतिरोधक एन्क्रिप्शनचा वापर. क्वांटम-समर्थित विपणन धोरणांमुळे ग्राहकांच्या गरजांवर आधारित जाहिराती तयार करता येतील, तर जलद आणि अचूक शोध प्रणालीमुळे खरेदीचा अनुभव सुलभ होईल. या तंत्रज्ञानामुळे ई-कॉमर्समध्ये केवळ सुधारणा होणार नाही, तर हा उद्योग नव्या उंचीवर जाईल. मात्र, त्यासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक, प्रशिक्षित मनुष्यबळ, आणि गोपनीयतेच्या मुद्द्यांवर लक्ष देणे आवश्यक आहे. ज्या कंपन्या या तंत्रज्ञानाचा अवलंब करतील, त्या भविष्यात उद्योगात आघाडीवर राहतील, आणि ई-कॉमर्सच्या या क्वांटम झेपेने ग्राहकांसाठी नव्या संधी निर्माण होतील.

# परभणी आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याची भिमशक्तीची मागणी..!

सोलापूर / प्रतिनिधी :- १० डिसेंबर २०२४ रोजी परभणी येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यासोबत असलेल्या संविधानाचे शिल्पकृतीची नासधूस करुन त्याची विटंबना जातीयवादी शक्तीकडून करण्यात आली, या भ्याड कृत्याचा भिमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने जाहीर निषेध करण्यात आला. या विटंबनाच्या निषधार्थ जे आंदोलक रस्त्यावर उतरले होते त्यांच्यावर दाखल करण्यात आलेले गुन्हे त्वरित मागे घ्यावेत. व तेथील अटक सत्र त्वरित थांबवावे, अशा आशयाची निवेदन भीमशक्ती सामाजिक संघटनेच्या वतीने खा. चंद्रकांत हांडोरे यांच्या आदेशानुसार निवासी उपजिल्हाधिकारी यांना देण्यात आले. या प्रकरणातील जो आरोपी सापडलेला आहे, तो बागायती



शेतकरी व सुशिक्षित आहे, तरीसुध्दा त्याच्या पाठीमागील शक्तीला लपविण्यासाठी पोलिस खात्याने त्या आरोपीला माथेफिरु, मनोरुग्ण संबोधून सर्व तपास गुंडाळण्याचा प्रयत्न करीत आहेत. या विटंबना पाठीमागची खरी माहिती उघड करण्यासाठी या आरोपीवर रिमांड काढून त्याच्याकडून खरी माहिती काढून हस्तगत करुन संबंधितावर त्वरीत कारवाई करण्यात यावी अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे, यावेळी महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस सुबोध वाघमोडे, पं.म. सरचिटणीस राजाभाऊ कदम, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष प्रमिला तुपलोंढे, शहर कार्याध्यक्ष अँड. कमरुनिसा बागवान, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष नसरीन शेख, मेजर साबळे, नागेश गायकवाड, के. एम. कांबळे, भारत क्षीरसागर, सलीम भाई मुल्ला, इब्राहीम शेख, रफिक शेख, कल्लप्पा बनसोडे, मुमताज शेख, मुमताज तांबोळी, ज्योती गायकवाड, विजयालक्ष्मी झाकणे, राजश्री साबळे, सचिन साबळे, गणेश चंदनशिवे, पप्पु गायकवाड, विक्रम वाघमारे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# ई.व्ही.एम मशीन बंद करून राज्यात ब्यालेट पेपरवर फेर निवडणूका घ्या - माजी आमदार पृथ्वीराज साठे

केज/प्रतिनिधी नुकत्याच महाराष्ट्र राज्यात विधानसभेच्या निवडणुका संपन्न झाल्या आहेत. या निवडणुकीत महायुतीला त्यांच्या अपेक्षित निकालापेक्षा अधिकचे यश मिळाले आहे.मात्र बऱ्याच ठिकाणचे निकाल हे संशयास्पद असल्याचे आढळून आले आहेत त्यामुळे राज्यात अनेक ठिकाणांहून फेरमतमोजनी तथा फेरमतदान घेण्याची मागणी होऊ लागली आहे.अशीच ईव्हीएम मशीन बंद करून ब्यालेट पेपरवर फेरमतदान घेण्याची मागणी केज विधानसभेचे महाविकास आघाडीचे उमेदवार तथा माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी उपविभागीय अधिकारी अंबाजोगाई यांच्या मार्फत मुख्य निवडणूक आयुक्त भारत सरकार तथा महाराष्ट्र राज्य यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे. यावेळी पृथ्वीराज साठे यांच्यासोबत महाविकास आघाडीचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी पृथ्वीराज साठे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की आम्ही भारतीय नागरिक म्हणून आम्हाला आमच्या मर्जीप्रमाणे मतदान करण्याचा व लोकप्रतिनिधी निवडण्याचा अधिकार संविधानाने दिलेला आहे आणि तो अधिकार आम्ही मतदानाच्या रुपात वापरतो आहोत.आजही अमेरिका, जर्मनी, नेदरलँड, इटलीसह बरेच प्रगत राष्ट्र ब्यालेटवर पेपरवर निवडणुका घेतात. पूर्वी भारतातसुद्धा निवडणुका या ब्यालेट पेपरवरच घेण्यात येऊन निकाल घोषित केला जात होता.सदर निवडणुकासाठी वेळ लागत होता परंतु निडणुका विश्वासपूर्वक व पारदर्शकपणे पार पाडल्या जात होत्या.परंतु सध्या देशासह राज्यातील निवडणुका ह्या ई.व्ही.एम मशिनवर घेण्यात येत आहेत. ई.व्ही.एम.हे मुळात एक यंत्र असून सदर यंत्रासोबत बहुतांश ठिकाणी छेडछाड करून झालेल्या निवडणुका व निकाल प्रभावित केल्या जात असल्याचा संशय येत आहे.




# संविधान उत्सव कार्यकर्ता शिबिरामध्ये- मूलभूत अधिकारासाठी मुंबई आरे मधील आदिवासींनी घेतली शपथ

मुंबई/ प्रतिनिधी : - १० डिसेंबर (आरे गोरेगाव) भारतीय संविधानाच्या ७५ वर्षा नंतरही मुंबईतील आरे मधील आदिवासी आजही मूलभूत अधिकारापासून वंचित असल्याचे दिसून येते.सरकारे येतात जातात त्यांनी या आदिवासी समाजासाठी अनेक योजना व त्यासाठी करोडो रुपये खर्च केले आहेत. पण मात्र खऱ्या लाभार्थी पर्यंत विकासाची गंगा पोहोचली नाही.त्यामुळे आजही मुंबईच्या हाके जवळील आरे मधील आदिवासी समाजाला पिण्याचे पाण्याचे अधिकृत कनेक्शन नाही,रस्ते चांगले नाहीत, वीज जोडणी नाही,सार्वजनिक शौचालय आदी अनेक मूलभूत अधिकारापासून वंचित असल्याचे दिसून येत आहेत. मागील दोन वर्षापासून पुकार सामाजिक संस्थेच्या 'संवेदना-फेलोशिप' या उपक्रमा अंतर्गत सुनील यादव यांच्या नेतृत्वाखाली आरे मधील आदिवासी पाड्यांमधील महिलांसोबत संविधानिक अधिकार जाणीव-जागृतीसाठी व सक्षमीकरणासाठी कार्यक्रम चालू आहेत.या फेलोशिप उपक्रम अंतर्गत भारतीय संविधानाचे उद्देशिकांमधील मूल्ये जनमानसात आणि तळागाळातील-दुर्लक्षित माणसापर्यंत पोहोचवण्यासाठी शिक्षण-प्रशिक्षण घेतले जाते.या प्रशिक्षणासाठी आरे कॉलनीतील युनिट नंबर ५,वणीचा पाडा,युनिट नंबर १३,जितनीचा पाडा,युनिट नंबर १८ आणि युनिट नंबर २९, जीवाचा पाडा या आदिवासी बहुल पाड्यांमधील विशेषत: महिला वर्ग समजून घेताना दिसून येत आहे.

संविधानाला ७५ वर्ष पूर्ण होत असल्याचे निमित्ताने २ डिसेंबर २०२४ रोजी वनीचा पाडा या ठिकाणी 'संविधान उत्सव' साजरा करण्यात आला. या उत्सवाच्या कार्यक्रमामध्ये ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते एडवोकेट निलेश खानविलकर यांनी संविधानाची मूल्य आणि अधिकार त्याचबरोबर आपण आपले अधिकार कसे मिळवावेत? याबाबत मार्गदर्शन केले.सदर कार्यक्रमामध्ये उपक्रम समन्वयक अनुराधा नारकर यांची सुद्धा उपस्थिती होती.या मार्गदर्शक शिबिरा तील उपस्थित महिला वर्गाने अशी प्रतिज्ञा केली की,आम्ही आता कोणत्याही राजकीय नेत्याकडे जाणार नाही. अथवा शिफारस घेणार नाही.आम्ही आमच्या मूलभूत अधिकारासाठी पाणी जोडणी अर्ज,पाड्यांमध्ये धुवा फवारणी करणे,कचरा उचलण्यासाठी,तसेच बचत गटाची बांधणी,सार्वजनिक शौचालयाचे बांधकाम आणि स्वच्छतेसाठी महापालिका आणि सरकारला पत्र व्यवहार करून आम्ही आमचे संविधानिक अधिकार पदरात पाडूनच घेऊ असा दृढ निश्चय करण्यात आला असल्याचे सुशांत इंगळे यांनी सांगितले.



PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE